महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ५८ /२०२३ दि. १३/०५/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत TMC कडून जनरल अरूणकुमार वैद्य चौक मार्गे, ओपन हाऊस येथून आराधना क्रॉस कडून हरिनिवास सर्कल कडे जाणाऱ्या सर्व खाजगी व TMT बसेस, ४०७ टेम्पो व त्यावरील सर्व जड, अवजड वाहने यांना आराधना क्रॉस या ठिकाणाहून हरिनिवास सर्कल कडे जाताना आराधना क्रॉस येथील कटने वळण बसत नसल्याने अडथळा होवून दोन्ही बाजूस वाहतूक कोंडी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) TMC सर्कल कडून जनरल अरूणकुमार वैद्य चौक कडून आराधना क्रॉस मार्गे हरिनिवास सर्कल कडे जाणा–या सर्व खाजगी व TMT बसेस, ४०७ टेम्पो व त्यावरील सर्व जड, अवजड वाहनांना **ओपन हाऊस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने जनरल अरूणकुमार वैद्य चौक कडून ओपन हाऊस चौक येथील मालवणी/तंबी हॉटेल येथून उजवीकडे वळून पुढे घडयाळ चौक येथून डावीकडे वळून हरिनिवास सर्कल चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) तीन हात नाका कडून घडयाळ चौक मार्गे ओपन हाऊस कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **घडयाळ चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने हरिनिवास सर्कल, आराधना क्रॉस मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**एक दिशा मार्ग –** ३) ओपन हाऊस येथील मालवणी/तंबी हॉटेल ते घडयाळ चौक हा संपूर्ण मार्ग **एक दिशा मार्ग** तसेच पी १, पी २ पार्किंग राहील. तसेच घडयाळ चौक येथून ओपन हाऊस कडे जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

**यु टर्न –** ४) सर्व खाजगी व TMT बसेस, ४०७ टेम्पो व त्यावरील सर्व जड, अवजड वाहनांना **तीन पेट्रोल पंप** कडून **'यु टर्न'** घेण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होईपावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.